**ठळक बातम्या**

- भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना १३५ व्या जयंतीनिमित्त देशभरातून अभिवादन

- नारीशक्ती वंदन अधिनियमातल्या सुधारणांना पाठिंबा देण्यासाठी स्थानिक खासदारांना पत्र लिहिण्याचं प्रधानमंत्र्यांचं महिलांना आवाहन

- बिहारमधलं मंत्रीमंडळ बरखास्त करण्याची मुख्यमंत्री नितीश कुमार यांची राज्यपालांना शिफारस

**आणि**

- इराण - अमेरिका चर्चेची पुढची फेरी लवकरच सुरू होण्याची शक्यता

**<><><><><>**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची 135 वी जयंती देशभरात साजरी होत आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी गुजरातमधल्या गांधीनगरमध्ये लोकभवन इथं असलेल्या बाबासाहेब आंबेडकरांच्या छायाचित्राला पुष्पांजली अर्पण केली. आंबेडकर जयंतीच्या निमित्ताने उपराष्ट्रपती सी.पी राधाकृष्णन, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला , राज्यसभेतले विरोधी पक्ष नेते मल्लिकार्जुन खर्गे, केंद्रीय मंत्री आणि खासदारांनी संसद परिसरातल्या प्रेरणास्थळ इथल्या डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळ्याला आदरांजली वाहिली.

मुंबईसह राज्यातही आंबेडकर जयंतीचा उत्साह दिसत आहे. बाबासाहेबांना अभिवादन करण्यासाठी मुंबईसह राज्याच्या विविध भागातून अनुयायी सकाळपासूनच चैत्यभूमीवर दाखल होत आहेत. चैत्यभूमीवर आज शासकीय मानवंदना देण्यात आली. राज्यपाल जिष्णु देव वर्मा, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि सुनेत्रा पवार यांच्यासह इतर मान्यवरांनी बाबासाहेबांना अभिवादन केलं. यावेळी मुख्यमंत्र्यांनी बाबासाहेबांच्या योगदानाची आठवण करुन दिली.

- **- - होल्ड - मुख्यमंत्री बाइट - --**

- **<><><><><>**

महाडच्या चवदार तळ्याचा सत्याग्रह म्हणजे डॉ. आंबेडकरांच्या जीवनकार्यातला एक मैलाचा दगड. याविषयी ज्येष्ठ विचारवंत डॉ. भालचंद्र मुणगेकर यांनी आकाशवाणीला विशेष मुलाखत दिली आहे. त्यात ते म्हणाले

**- - होल्ड... बाईट - -**

ही पूर्ण मुलाखत आकाशवाणीच्या मुंबई केंद्रावरून आज संध्याकाळी सव्वासात वाजता ऐकता येईल.

**<><><><>**

देशातल्या सर्व महिलांनी स्थानिक खासदारांना पत्र लिहून नारीशक्ती वंदन अधिनियमातल्या सुधारणांना पाठिंबा देण्यासाठी प्रोत्साहित करावं असं आवाहन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी पत्राद्वारे केलं आहे. देशातल्या महिला वर्गाला उद्देशून एक पत्र त्यांनी समाजमाध्यमांवर प्रसारित केलं आहे. १६ एप्रिलपासून संसदेत यावर चर्चा सुरू होणार आहे. २०२९ च्या लोकसभा आणि विधानसभा निवडणुकांपासून देशात महिलांसाठी आरक्षण लागू करायचं असेल तर या सुधारणा मंजूर होण्याची गरज आहे. या निर्णयाचा परिणाम कित्येक शतकांपर्यंत देशावर होईल असं त्यांनी या पत्रात नमूद केलं आहे. हे विधेयक मंजूर होण्यासाठी देशातल्या कोट्यावधी महिलांचे आशिर्वाद आवश्यक असल्याचं त्यांनी सांगितलं.

महिलांचं प्रतिनिधीत्व वाढल्यानं देशातली लोकशाही आणखी मजूबत होईल. देशातल्या महिला धोरण निर्मिती आणि निर्णय प्रक्रियेत सहभागी होतील तेव्हा विकसित भारताचं स्वप्न अधिक जलद आणि सक्षमरित्या पूर्ण होईल, अशी आशा त्यांनी व्यक्त केली.

**<><><><>**

प्रस्तावित संविधान सुधारणा विधेयकांचा मसुदा अजूनपर्यंत खासदारांना उपलब्ध करुन दिल्या नसल्याचा दावा विरोधी पक्षांनी केला आहे. ही लोकशाहीची थट्टा असल्याचा आरोप काँग्रेसचे खासदार जयराम रमेश यांनी केला आहे. तृणमूल काँग्रेसचे राज्यसभेतले नेते डेरेक ओ ब्रायन यांनीही याच मुद्द्यावरुन सरकारवर टीका केली आहे.

**<><><><>**

बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार यांनी मंत्रीमंडळ बरखास्त करण्याची शिफारस राज्यपाल सय्यद अता हसनैन यांना केली असल्याची माहिती, बिहारमधले मंत्री राम कृपाल यादव यांनी दिली आहे. थोड्याच वेळात राज्यपालांची भेट घेऊन ते मुख्यमंत्रीपदाचा

राजीनामा देणार आहेत. सर्वाधिक काळ बिहारचे मुख्यमंत्रीपद भुषवलेले नितीश कुमार यांनी मंत्रीमंडळाच्या बैठकीत या निर्णयाची माहिती दिली. मुख्यमंत्री पदाचा राजीनामा देण्यापूर्वी मंत्रीमंडळ बरखास्त करणं आवश्यक असतं. २४३ सदस्यांच्या बिहार विधानसभेत ८९ आमदार असलेला भाजपा हा सर्वात मोठा पक्ष आहे. भाजपाच्या विधीमंडळ गटनेत्याची निवडही आज दुपारी होणार आहे. त्यानंतर बिहारमध्ये भाजपाचा मुख्यमंत्री शपथ घेण्याची शक्यता आहे.

**<><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आज उत्तराखंडमधे दिल्ली – देहरादून इकॉनॉमिक कॉरिडॉरचं उद्घाटन होणार आहे. या कार्यक्रमासाठी थोड्यावेळापूर्वीच प्रधानमंत्री देहरादूनला पोहचले, तेव्हा स्थानिकांनी त्यांचं उत्साहाने स्वागत केलं. या कॉरिडॉरमुळे दिल्ली आणि डेहरादून दरम्यानच्या प्रवासासाठी वेळ अडीच तासांपर्यंत कमी होईल.

**<><><><>**

पश्चिम बंगालमध्ये विधानसभा निवडणुकीसाठी २ हजार ९२६ उमेदवार रिंगणात आहेत. मतदानाचा पहिला टप्पा २३ एप्रिलला तर दुसरा टप्पा २९ एप्रिलला आहे. दुसऱ्या टप्प्यातल्या उमेदवारांसाठी काल अर्ज माघारीचा शेवटचा दिवस होता. अर्ज माघारीनंतर आता पहिल्या टप्प्यातल्या मतदारसंघांमधले १ हजार ४७८ तर दुसऱ्या टप्प्यातल्या मतदारसंघातले १ हजार ४४८ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात आहेत. ECINet या ॲपवर उमेदवारांनी निवडणूक आयोगाला दिलेली माहिती बघता येईल तसंच प्रतिज्ञापत्र डाऊनलोड करता येईल अशी माहिती निवडणूक आयोगाने दिली आहे.

**<><><><>**

उत्तरप्रदेशात नॉएडा इथं विविध क्षेत्रातल्या कामगारांनी आंदोलन छेडल्यानंतर राज्य सरकारने किमान वेतनात वाढ केली आहे. गौतमबुद्धनगरच्या जिल्हा दंडाधिकाऱ्यांनी सांगितलं की उच्चाधिकार समितीने हा निर्णय घेतला असून गेल्या १ तारखेपासून पूर्वलक्ष्यी प्रभावाने तो लागू होईल. राज्यातल्या इतर महानगरपालिका क्षेत्रात तसंच जिल्हा किमान वेतनात वाढ करण्यात आली आहे. पश्चिम आशियातल्या युद्धामुळे खर्चात वाढ झाली असून जगण्यासाठी आवश्यक वेतन मिळावं या मागणीसाठी नॉएडाच्या औद्योगिक पट्ट्यातल्या कामगारांनी मोठ्या प्रमाणावर निदर्शनं केली. काही ठिकाणी आंदोलनाला हिंसक वळण

लागलं. आंदोलनादरम्यान झालेल्या हिंसाचार प्रकरणी ३०० जणांची धरपकड केली असून ७ गुन्ह्यांची नोंद केली आहे. नॉएडातली आंदोलनं हे सुनियोजित कारस्थान असल्याचं उत्तरप्रदेशचे कामगार मंत्री अनिल राजभर यांनी म्हटलं आहे. गेल्या काही दिवसात मेरठ आणि नॉएडामधून ४ संशयित दहशतवाद्यांना पकडलं होतं, याचा उल्लेख करुन ते म्हणाले की राज्यात अस्थिरता निर्माण करण्यासाठी केलेलं हा कट असू शकतो.

**<><><><><>**

अमेरिका आणि इराणमध्ये चर्चेची पुढची फेरी लवकरच होऊ शकते अशी शक्यता पाकिस्तानचे संरक्षणमंत्री ख्वाजा आसिफ यांनी व्यक्त केली आहे. काही दिवसांपूर्वी दोन्ही देशांमध्ये इस्लामाबादमध्ये झालेल्या चर्चेत काहीही तोडगा निघाला नव्हता. पण दोन्ही देशांनी तोडगा काढण्याच्या दिशेने खूप प्रगती केल्याचं अमेरिकेचे उपाध्यक्ष जे डी व्हान्स म्हणाले. अमेरिकेने दिलेल्या प्रस्तावावर कुणाकडून मंजुरी घ्यायची याची स्पष्टता इराणच्या शिष्टमंडळाकडे नव्हते. त्यासाठी ते तेहरानला परत गेल्याचा दावा व्हान्स यांनी केला. इराणने एकही अण्वस्त्र बाळगू नये ही अमेरिकेची भूमिका कायम असल्याचं त्यांनी स्पष्ट केलं.

गुरुवारी पुढच्या टप्प्यातली चर्चा होण्याची शक्यता अमेरिकी प्रसारमाध्यमांनी वर्तवली आहे. इस्लामाबाद किंवा जीनिव्हामध्ये या चर्चा होऊ शकतात. यापूर्वीचेच शिष्टमंडळ यात भाग घेणार की नाही, हे अजून स्पष्ट झालेलं नाही.

अमेरिका आणि इराणमध्ये एका रात्रीत युद्धबंदी होणार नाही. पण चर्चा सुरू ठेवणं आवश्यक असल्याची भूमिका संयुक्त राष्ट्रांचे सरचिटणीस अँटोनियो गुटारेस यांनी घेतली आहे.

**//<><><><><>//**